# रोकडविरहीत भारतीय अर्थव्यवस्था: आव्हाने व उपाय

**सहा. प्रा. ए.डी. मडावी**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
आदर्श महाविद्यालय, हिंगोली

**सहा. प्रा. व्ही.एस. पवार**
समाजशास्त्र विभाग,
आदर्श महाविद्यालय, हिंगोली

---

**प्रस्तावना—**

प्राचीन काळी देवान—घेवानीचे व्यवहार वस्तू विनिमय पध्दतीने होत होते. त्या काळात व्यापार करण्यासाठी स्वत:जवळ मोठया प्रमाणात वस्तूची साठवण करावी लागत असे. त्यामुळे या पध्दतीने व्यवहार करणे अडचणीचे ठरत होते. या पध्दतीत बदल करून नंतरच्या काळामध्ये व्यवहारासाठी अर्थव्यवस्थेत चलन म्हणून धातूची नाणी वापरण्यात येवू लागली. परंतु नंतर ते नाणे देखील स्वत:जवळ बाळगणे गैरसोईचे होवू लागले. त्यामुळे चलनामध्ये कागदी नोटांचा वापर सुरू झाला. कागदी नोटांमुळे अर्थव्यवस्था सुरळीतपणे चालू लागली.

भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी ८ डिसेंबर २०१६ रोजी ५०० व १००० रूपयांच्या नोटा चलनातून बाद करण्याचा निर्णय जाहिर केला. रद्द केलेल्या नोटा देशाच्या चलनात ८६ टक्के म्हणजे जीडीपीच्या १२.२ टक्के होत्या. चलनी नोटा बाद करण्यामागे भारत सरकारचा उद्देश असा होता की भ्रष्टाचार, काळया पैशाला आळा घालणे तसेच कमीत कमी रोकड वापरणारी अर्थव्यवस्था निर्माण करणे, म्हणजेच रोकडविरहीत अर्थव्यवस्था निर्माण करणे. परंतु अर्थव्यवस्थेतील व स्वत:जवळील रोख पैसा कमी झाल्यामुळे लोकांना आपले व्यवहार पूर्ण करण्यासाठी पर्यायी मार्गाचा शोध व स्विकार करणे भाग पडले. आपले व्यवहार पूर्ण करण्यासाठी लोकांनी रोकडविरहीत व्यवहाराचा मार्ग अवलंबला. अशा रीतीने आर्थिक व्यवहारात मोठया प्रमाणात रोकडविरहीत साधनांचा वापर करण्यास सुरवात झाली.

**शोध निबंधाचे उद्दिष्टे:—**

१) रोकडविरहीत व्यवहाराचा अभ्यास करणे.
२) रोकडविरहीत व्यवहार करतांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
३) रोकडविरहीत व्यवहारासाठी असणाऱ्या साधनांचा अभ्यास करणे.
४) रोकडविरहीत व्यवहारातील अडचणीवरीलउपाययोजनांचा शोध घेणे.

**संशोधन पध्दती व तथ्य संकलन:—**

प्रस्तूत शोध निबंधासाठी रोकडविरहीत अर्थव्यवस्था: आव्हाने व उपाय हा विषय निवडला असून शोध निबंधाच्या उद्दिष्टाप्रत पोहचण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

प्रस्तूत शोध निबंधाच्या तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, विविध संकेतस्थळे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**रोकडविरहीत व्यवहार म्हणजे काय?:—**

रोकडविरहीत व्यवहार म्हणजे सर्व आर्थिक देवाण—घेवाण कोणत्याही रोख रक्कमेशिवाय करणे होय. एखाद्या वस्तूचे अथवा सेवेचा मोबदला, देयकांचा भरणा डेबिट कार्ड/क्रेडीट कार्ड या साधनांव्दारे किंवा इंटरनेटच्या आधारे बँकिंग प्रणालीचा वापर करून किंवा मोबाईल वरील विविध ॲप्सच्या माध्यमातून करण्यात आले तर अशा व्यवहारास रोकडविरहीत व्यवहार म्हणतात. कोणत्याही देण्या—घेण्याच्या आर्थिक व्यवहारासाठी कागदी चलनांचा वापर न करता केलेले व्यवहार रोकडविरहीत व्यवहार होय. म्हणजेच डिजिटल पध्दतीने करण्यात येणारे आर्थिक व्यवहार हे रोकडविरहीत व्यवहार ठरतात. आपण घरबसल्या आपल्या सोयीनूसार संगणक प्रणालीचा वापर करून केलेले व्यवहार डिजिटल व्यवहार होय.

**रोकडविरहीत अर्थव्यवस्था:—**

संपूर्णपणे रोकडविरहीत अर्थव्यवस्था असणारा एकही देश आजच्या जगात नाही. रोकडविरहीत व्यवहारांचा अधिकाअधिक वापर करणाऱ्या देशांमध्ये प्रगत देशांचा समावेश होतो. प्रामुख्याने डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन हे देश वेगाने रोकडविरहीत अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करीत आहेत. डेन्मार्क किंवा स्वीडन सर्व प्रथम संपूर्णत: रोकडविरहीत अर्थव्यवस्था होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. स्वीडन या देशात २५ टक्के आर्थिक व्यवहार नो कॅश पध्दतीने होत असतात तर भारतात नो कॅश व्यवहाराचे प्रमाण २२ टक्के आहे. भ्रष्टाचार कमीतकमी असणाऱ्या देशांच्या यादीत स्वीडन तिसऱ्या क्रमांकावर आहे तर भारत या यादीत ७६ व्या क्रमांकावर आहे. यावरून रोकडविरहीत व्यवहार जेवढे जास्त तेवढा भ्रष्टाचार कमी असतो. अमेरिकेमध्ये ७० ते ८० टक्के व्यवहार कॅशलेस पध्दतीने होतात. तेथे १०० डॉलरच्या वर चलन अस्तित्वात नाही. अमेरिकेने १९६९ मध्ये १०० डॉलरच्या वर नोट बंद केल्या आहेत.

भारतीय अर्थव्यवस्था रोकडविरहीत व्यवहार करण्यामध्ये इतर देशांच्या तुलनेत खुप मागे आहे. भारतामध्ये २०१४ साली चलनाचे प्रमाण सकल देशातर्गत उत्पादनाच्या १२.४२ टक्के होते. हेच प्रमाण चीनमध्ये ९.४७ टक्के तर ब्राझीलमध्ये ८ टक्के असल्याचे दिसून येते. भारताची इतर विकसनशील आणि विकसीत देशांशी तुलना केल्यास बहुतेक देशांपेक्षा भारतीय अर्थव्यवस्थेत वर्तमान परिस्थितीत जवळपास ६० टक्के व्यवहार नगदी स्वरूपात होतात. विशेषत: ग्रामीण अर्थव्यवस्था ही संपूर्णत: नगदी व्यवहारावरच आधारीत आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास ६८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करून राहते. या ग्रामीण भागातील कामगारांना नगदी स्वरूपात मजूरी मिळते. याचाच अर्थ भारतीय अर्थव्यवस्था रोकडविरहीत होण्यासाठी ग्रामीण भागातील व्यवहारांवर अवलंबून आहे.

**रोकडविरहीत व्यवहाराची साधने:—**

भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या नोटबंदीच्या निर्णयावर उलटसुलट प्रतिक्रिया उमटत असतांना मा. पंतप्रधान मात्र आपल्या निर्णयावर ठाम आहेत. त्यांनी आपल्या मन की बात या कार्यक्रमातूनही रोकडविरहीत अर्थव्यवस्थेवर जोर दिला आहे. नरेंद्र मोदी यांनी मेरा मोबाईल.... मेरा बॅक ....... मेरा बटुआ असा संदेश देत रोकडविरहीत व्यवहारासाठी डिजिटल मार्गाचा अवलंब करण्यास सांगीतले आहे. रोकडविरहीत व्यवहारासाठी वापरण्यात येणारी साधने पुढीलप्रमाणे—

१) **प्लास्टीक मनी ( डेबीट कार्ड/क्रेडीट कार्ड)—**भारतात नोटबंदी अगोदर प्लास्टीक मनी या साधनाचा मर्यादीत वापर होता. परंतु आता त्यात झपाटयाने वाढ होत आहे. यामध्ये क्रेडीट व डेबिट कार्डचा वापर करून एटीएम मधून पैसे काढणे, पैसे हस्तांतरीत करणे, वस्तूंची खरेदी करणे इत्यादी अशी कामे करता येतात. या साधनांव्दारे ग्राहकांना कोणत्याही बॅकेच्या एटीएम व्दारे आपले व्यवहार पार पाडता येतात. येथे मात्र प्लास्टीक मनी वापरामध्ये पैसा बॅक खात्याच्या माध्यमातून ग्राहकांमध्ये हस्तांतरीत होतो.

२) **चेक/डीडी—**सर्वांना परिचयाची असलेली ही जुनी पध्दती आहे. या पध्दतीमध्ये आर्थिक व्यवहार हे चलनी नोटांशिवाय पूर्ण केले जातात. मात्र या पध्दतीत प्रत्यक्ष बॅकेत जावून सर्व आर्थिक व्यवहार करावे लागत असल्यामुळे वेळ जास्त खर्च होतो.

३) **नेट बॅकिंग —**ही एक इंटरनेटवर आधारीत बॅकिंग प्रणाली आहे. या प्रणालीव्दारे ग्राहक घर बसल्या किंवा आपल्या कार्यालयातील संगणकाव्दारे बॅकेच्या संपर्कात राहून आपल्या खात्यातील रक्कम तपासणे, पैशाचे हस्तांतरण करणे, देयकांचे शोधन करणे, अर्ज करणे, विविध योजनांची माहिती घेणे इत्यादी आर्थिक व्यवहार पार पाडू शकतो.

४) **मोबाईल बॅकिंग —**ही सुध्दा इंटरनेटवर आधारीत एक बॅकिंग प्रणाली आहे. या सेवेव्दारे ग्राहक आपल्या स्मार्ट फोनच्या आधारे बॅकेच्या संपर्कात राहून वस्तूंची ऑनलाईन खरेदी करणे, पैशाचे हस्तांतरण करणे, खात्यातील रक्कम तपासणे, अर्ज करणे, इत्यादी आर्थिक व्यवहार पूर्ण करू शकतो.

५) **पीओएस मशिन —**पीओएस (POS)म्हणजेच पाईंट ऑफ सेल अर्थात विक्रीचे ठिकाण. शहरी भागात ही अगदी सामान्य बाबत झाली आहे. या साधनाव्दारे आपण विक्रेत्याकडून वस्तू खरेदी केल्यास विक्रेता बिलाची रक्कम सांगून ती रक्कम त्याच्याकडील (POS)मशिनमध्ये आपले कार्ड सरकवून (स्वाईप करून)पिन टाकला की आपल्या बॅक खात्यातून रक्कम लगेच विक्रेत्याच्या खात्यात जमा होते. ही मशिन दुकाने, थिएटर, पेट्रोल पंप इत्यादी ठिकाणी पहायला मिळते.

६) **अविस्तृत पुरक सेवा माहिती** (USSD)— अनस्ट्रक्चर्ड सप्लीमेन्ट्री सर्व्हीस डेटा (USSD)या प्रणालीच्या सहायाने कोणत्याही मोबाईलच्या इंटरफेसमधून आपण पैसे पाठवू शकतो. यासाठी आपल्याकडे स्मार्ट फोन असण्याची आवश्यकता नाही.

७) **आधार सक्षम पेमेंट सिस्टीम** (AEPS)— आधार कार्डच्या सहायाने आपले आर्थिक व्यवहार पूर्ण करता येतात. या साधनाव्दारे आर्थिक व्यवहार पार पाडण्यासाठी आपले आधार कार्ड बॅक खात्याशी जोडून घेणे आवश्यक आहे. आधार बायोमॅट्रीक्सच्यावेळी रेकॉर्ड केले गेलेले तुमचे फिंगर प्रिंट खरेदी—विक्रीच्या व्यवहारात ग्राह्य धरले जातात.

८) **ई—वॉलेट** (E-Wallet)— आपल्या मोबाईल वरून फोटो पाठविणे जेवढे सोपे आहे तेवढेच ई—वॉलेटव्दारे मोबाईल किंवा संगणकामधून पैशाचे व्यवहार करणे शक्य आहे. सोप्या शब्दात सांगायचे तर हे एक मोबाईल मध्ये असलेले आभासी पाकीट आहे. ई—वॉलेटमध्ये आपण ठराविक रक्कम साठवून ठेवू शकतो आणि ती रक्कम कुठेही व कोणत्याही वेळी आर्थिक व्यवहारासाठी वापरू शकतो.

९) **युपीआय** (UPI)—युनिफाईड पेमेंट इंटरफेस(UPI) हे साधन मोबाईलमधून मेसेज पाठविण्याइतके सोपे आहे. प्रत्येक बॅकेचे स्वत:चे मोबाईल ॲप आहे. या ॲपच्या मदतीने स्मार्ट फोनचा वापर करून आर्थिक व्यवहाार करणे शक्य झाले आहे. युपीआय व ई—वॉलेट हे दोन वेगवेगळे साधन असून युपीआयमध्ये ई—वॉलेट प्रमाणे पैसे भरण्याची गरज नसते. तर यासाठी थेट बॅक खात्यामधून व्यवहार केला जातो. भविष्यात या साधनाचा वापर अधिक केला जाईल अशी आशा आहे.

१०) **ऑनलाईन हस्तांतरण** (RTGS/NEFT)**—**रोकडविरहीत व्यवहारासाठी हा सर्वात सोपा मार्ग आहे. मोठया रक्कमेचे हस्तांतरण करण्यासाठी RTGS/NEFT **या** मार्गाचा अवलंब करण्यात येतो. मात्र रोख रक्कम हस्तांतरीत करण्यासाठी इंटरनेटची सुविध असणे गरजेचे आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील रोकडविरहीत व्यवहारासंबंधी आव्हाने:—**

१) भारत जरी रोकडविरहीत अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने पुढे चालत असला तरी त्यापुढे अनेक आव्हाने समोर असल्याचे दिसते आहे. भारताची लोकसंख्या १३० कोटीपेक्षा जास्त आहे. त्यापैकी जवळपास ६५ ते ७० टक्के लोकसंख्या ही ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. या भागामध्ये अपुऱ्या सोयी—सुविधा असल्याने रोकडविरहीत व्यवहार करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते आहे. तेव्हा अशा भागांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे एक भारतापुढे मोठे आव्हान आहे.

२) जनधन योजना या सारख्या योजना आखून सुध्दा देशातील खुप मोठा वर्ग बॅंकिंग सेवांपासून दूर आहे. त्यामुळे त्यांना रोकडविरहीत व्यवहारांसाठी आवश्यक साधने मिळणे कठीण जात आहे. तसेच जनधन योजनेअंतर्गत चालू करण्यात आलेल्या खात्यांपेकी जवळपास २० ते २३ टक्के खात्यात शुन्य टक्के रक्कम आहे. रोकडविरहीत व्यवहाराच्या यशस्वीतेसाठी ही खाती कार्यक्षमपणे वापर करण्यास चालना देण्याची गरज आहे.

३) मोबाईलव्दारे डिजिटल पेमेंट करण्यासाठी स्मार्ट फोनची आवश्यकता असते. परंतू भारतातील बऱ्याच लोकांकडे ते उपलब्ध नाही. तसेच क्रेडीट कार्ड / डेबीट कार्ड, मोबाईल वॉलेट यांचा वापर करून केलेल्या व्यवहारांमुळे मिळणारे फायदे बहुसंख्य जनतेला माहित नाहीत. त्यामुळे भारतातील बहुसंख्य नागरीक आर्थिक व्यवहारांसाठी रोख रक्कमेलाच प्राधान्य देतात.

४) आपल्या देशामध्ये इतर देशाच्या तुलनेत इंटरनेट वापरणाऱ्यांचे प्रमाण खुप कमी आहे. इंटरनेट व वीजेअभावी विशेषत: ग्रामीण भागांमध्ये रोकडविरहीत व्यवहार करणे शक्य होत नाही. तसेच वेगवान इंटरनेटची जोडणीसुध्दा पुरेशा प्रमाणात नाही. सार्वजनिक वायफाय, मोबाईल चार्जिंग स्टेशन अशा सुविधा फार कमी प्रमाणात दिसून येतात.

५) हॅकींग आणि सायबर चोरी हे डिजिटल क्षेत्रासमोरील फार मोठे आव्हान आहे. रोकडविरहीत अर्थव्यवस्थेमध्ये जास्तीत जास्त आर्थिक व्यवहार हे इलेक्ट्रानिक्स पध्दतीने पार पाडल्या जातात. इंटरनेटचा जास्तीत जास्त वापर हा सायबर गुन्ह्यांना उत्तेजन देणारा आहे.

६) रोकडविरहीत अर्थव्यवस्थेमध्ये पिओएस (POS) मशिनची भूमिका फार महत्वाची आहे. किरकोळ कामापासून ते मोठमोठया मॉल्समध्ये ग्राहक हे पीओएस मशिन्सच्या आधारे देयके देत असतात. परंतु सध्या देशामध्ये १५ लाख पीओएस मशिन्स असून एवढया कमी पीओएस मशिन्समधून डिजिटल व्यवहार करण्यावर मर्यादा येतात.

**रोकडविरहीतव्यवहारासाठी आव्हानांवरील उपाययोजना:—**

१) भारतीय अर्थव्यवस्था रोकडविरहीत होण्यासाठी भारतीय समाजाची डिजिटल साक्षरता वाढविण्यासाठी सरकारने प्रयत्न करावे.
२) रोकडविरहीत व्यवहार करताना सुरक्षिततेला सर्वाधिक प्राधान्य देवून लोकांमध्ये विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे.
३) रोकडविरहीत व्यवहारांवर लादण्यात येणारे अधिभार कमी करून जनतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.
४) रोकडविरहीत व्यवहारांसाठी सर्व जनतेला बॅंकिंग व्यवहारात आणले जाणे गरजेचे आहे.
५) पीओएस(POS)मशिनची सद्य:स्थितीतील संख्या खुपच कमी आहे. ती वाढविण्यासाठी बॅंकांना प्रोत्साहन देणे.
६) ग्रामीण भागात राष्ट्रीयकृत बॅंकांचे किंवा सहकारी बॅंकाचे जाळे निर्माण करणे तसेच या शाखांमध्ये ई—बॅंकिंग सुविधा निर्माण करून देणे.
७) एटीएम मशिन्सची सुविधा सर्वत्र उपलब्ध करून देणे.
८) ग्रामीण भागात शासकीय खर्चातून वेगवान इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देणे.

**सारांश:—**

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात एका नवीन क्रांतीमुळे माध्यमांची गुणवत्ता वाढत आहे. बदलत्या युगात संवादवहनाचे व जनसंपर्काची माध्यमे प्रगती करीत आहेत. नवनवीन सुधारणांमुळे माध्यमांच्या कार्यात गतिशिलता निर्माण झाली आहे. या बदलत्या स्वरूपाचा फायदा देशाच्या अर्थव्यवस्थेला होत असलेला दिसून येतो. रोखीने मोठ्या प्रमाणात व्यवहार होत असल्यास भ्रष्टाचार, काळा पैसा, कर चुकवेगीरी, चलनसाठा, आंतकी कारवाही इत्यादी समस्या निर्माण होतात. रोकडविरहीत व्यवहारांमुळे वरील समस्यांची पूर्णत: सोडवणूक होत नसली तरी त्याची तीव्रता बऱ्याच प्रमाणात कमी होण्यास मदत होते.

**संदर्भसूची:—**

१)योजना मासिक — फेब्रुवारी २०१७.
२) कुरूक्षेत्र मासिक — ऑगस्ट २०१७.
३) अर्थवेध — शांभवी प्रकाशन, औरंगाबाद, फेब्रुवारी २०१८.
४) दैनिक लोकसत्ता — २७ नोव्हेंबर २०१६.
५)http://cashlessindia.gov.in



View publication stats